**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

**1. भारत-अमेरिका व्यापार कराराला वर्षभराच्या चर्चेनंतर अंतिम स्वरुप दिल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांचं आज लोकसभेत निवेदन**

**2. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आजपासून सुरू**

**3. अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासाठी १२ हेक्टर जागा मंजूर, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय**

**आणि**

**4. 'ॲडव्हांटेज विदर्भ 2026 - खासदार औद्योगिक महोत्सव'चे 6 फेब्रुवारीला उद्घाटन,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती**

**आता सविस्तर बातम्या .......**

**पीयूष गोयल लोकसभा**

भारत - अमेरिका व्यापार कराराविषयी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज लोकसभेत निवेदन दिलं. या करारावर दोन्ही देशांनी एक वर्ष चर्चा केली, त्यानंतर त्याला अंतिम स्वरूप दिलं गेलं. या करारात भारताला आपल्या महत्त्वाच्या क्षेत्रांचं हित साधण्यात यश आल्याचं गोयल यांनी सभागृहाला सांगितलं. कृषी, दुग्धव्यवसाय या क्षेत्रांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण होतील असं गोयल यांनी नमूद केलं. या करारामुळे मेक इन इंडिया ही संकल्पना पूर्ण व्हायला मदत होईल, विकसित भारत २०४७ या ध्येयाकडे जाण्यासाठी हे महत्त्वाचं पाऊल आहे, असं ते म्हणाले. अमेरिकेनं भारतावर लावलेलं आयात शुल्क अठरा टक्क्यांवर आणल्यामुळे अमेरिकन बाजारपेठेकडे भारताची निर्यात वाढेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पीयूष गोयल बोलत असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. या गदारोळातच गोयल यांनी आपलं निवदेन पूर्ण केलं. त्यानंतर सभापतींनी सदस्यांना

शांत राहायचं आवाहन केलं मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं..

**रिझर्व्ह बँक पतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक आजपासून सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली सहा सदस्यांची पत आणि वित्त धोरण समिती येत्या शुक्रवारी द्वैमासिक आढावा जाहीर करेल. रिझर्व बँकेनं गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात रेपो दरात कपात करुन तो सव्वा पाच टक्के केला होता.

**परीक्षा पे चर्चा**

परीक्षा पे चर्चा हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांशी संवाद हा कार्यक्रम येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता प्रसारित होणार आहे. तणावमुक्त वातावरणात परीक्षा देण्याचं महत्त्व, तसंच मनाची शांतता, आत्मविश्वास वाढवणं आणि आव्हानांवर मात करणं यासाठीचे उपाय, याबाबद पंतप्रधान विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. यावर्षी देवमोगरा, कोइमतूर, रायपूर, गुवाहाटी आणि नवी दिल्लीतल्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

**राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय**

भारत सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO),आणि गुणवत्ता नियंत्रण विभाग, विभागीय कार्यालय नागपूर, यांच्या समन्वयाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर येथे, राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षणावर एक दिवसीय विभागीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. पश्चिम विभागाचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पला यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन होईल. एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत नियोजित असलेल्या आगामी NHIS २०२६ च्या तयारीसाठी हे प्रशिक्षण आयोजित केले जात आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि छत्तीसगड येथील सांख्यिकी अधिकारी, पर्यवेक्षक आणि प्रगणक यांच्यासह सुमारे १७० क्षेत्रीय अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होतील.

**शरद पवार**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करत असून, राजकीय जुळवाजुळव करण्यावर नाही, असं पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज बारामती इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाबाबत विचारण्यात आलं असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विलिनीकरणाशी मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांचा संबंध नाही, दिवंगत अजित पवार यांची जयंत पाटील यांच्याबरोबर याविषयी चर्चा झाली होती, असं ते म्हणाले. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना, अपघाताच्या चौकशीसंदर्भात सरकारनं योग्य निर्णय घ्यावा, असंही पवार यांनी सांगितलं.

**अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय**

अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयासाठी आलियाबाद येथे ११.२९ हेक्टर जागा मंजूर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. या ठिकाणी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे अदययावत रुग्णालय उभारण्यात येणार आहे. जमीन वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असून, तीन वर्षांत बांधकाम पूर्ण करण्याची अट घालण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण पश्चिम विदर्भातील आरोग्यसेवांना मोठे बळ मिळणार आहे.

**जागांमध्ये वाढ**

अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आगामी शैक्षणिक सत्रापासून एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा वाढण्याची शक्यता आहे. सध्या असलेल्या २०० जागांवरून ५० जागांची वाढ करून २५० प्रवेश देण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. प्रस्तावास मंजुरी मिळाल्यास अधिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळणार आहे.

**'ॲडव्हांटेज विदर्भ 2026'**

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (AID) यांच्या वतीने आयोजित 'ॲडव्हांटेज विदर्भ 2026 - खासदार औद्योगिक महोत्सव'चे उद्घाटन शुक्रवार, 6 फेब्रुवारी रोजी नागपूर येथे होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तीन दिवस चालणारा हा महोत्सव "एम्पॉवरिंग ग्रोथ" या संकल्पनेवर आधारित असून विदर्भातील औद्योगिक क्षमता, गुंतवणूक व नवकल्पनांचे प्रदर्शन होणार आहे. आंतरराष्ट्रीय बिझनेस कॉन्क्लेव्हमध्ये 23 हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. देशातील नामवंत उद्योगपती, मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांची उपस्थिती लाभणार असून सांस्कृतिक कार्यक्रम, फूड फेस्टिव्हल, ई-व्ही एक्स्पो व ड्रोन शो ही विशेष आकर्षणे असणार आहेत.

**अस्थिकलश**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अस्थिकलश काल भंडाऱ्यात आणण्यात आला. सर्वपक्षीय श्रद्धांजली सभा घेण्यात आली. त्यानंतर सायंकाळी वैनगंगा नदीत भावपूर्ण वातावरणात अस्थिविसर्जन करण्यात आलं. या वेळी विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सुनिल तटकरे**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षाची घोषणा लवकरच केली जाईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी दिली आहे. मुंबईत ते वार्ताहरांशी बोलत होते. सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून पक्षाला मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले. विलिनीकरणाच्या मुद्द्यावर भाजपाशी चर्चा आवश्यक असल्याचा पुनरुच्चार तटकरे यांनी आज केला.

**रस्ता सुरक्षा-जीवन रक्षा' वॉकेथॉन**

वाढते अपघात रोखण्यासाठी उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय भंडारा तर्फे काल शहरात भव्य '**रस्ता सुरक्षा जीवन रक्षा**' वॉकेथॉन रॅली आयोजित करण्यात आली. सुमारे ३०० तरुण-तरुणींच्या सहभागाने निघालेल्या या रॅलीतून रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश जाधव यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. यात आरटीओ, वाहतूक पोलीस आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ध्वनिक्षेपकाद्वारे नियम पाळण्याचे भावनिक आवाहन करत शहरातील प्रमुख चौकांतून वॉकेथॉन काढण्यात आली.

**अशोक उईके**

केंद्र सरकारचा अर्थसंकल्प शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून सादर करण्यात आल्याचे आदिवासी विकास मंत्री तथा संपर्क मंत्री प्रा.अशोक उईके यांनी सांगितलं. यवतमाळ जिल्ह्यात टेक्स्टाईल पार्क उभारणे आणि वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पाला गती देण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. जिल्ह्यात उद्योग, रोजगार व व्यवसाय वाढीसाठी नियोजन मांडणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

*****